Estd : 1962

" A++" Accrediated by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विधानपरिषद अतारांकित प्रश्न/ अत्यंत महत्वाचे/तात्काळ/विनाविलंब**

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संचालक,**

**सर्व संलग्नीत महाविद्यालये,**

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**विषय:-** विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्रमांक ९७८८ चे अनुषंगाने राज्यातील महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून अनामत रक्कम परत करण्याबाबत...

**संदर्भ:-** १. जा.क्र. विससं/कोवि/शिवि.अनु/२०२०-२१/६३८४ दि. १०/१२/२०२१ रोजीचे मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे पत्र.

२. जा.क्र. उशिसं/वि.प.अता.प्र.९७८८/मवि-१/२०२१/१४१४५ दि. ०९/१२/२०२१ रोजीचे शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे याचे पत्र.

३. विधान मंडळ सचिवालयाचे पत्र क्र.---/ई-१ दि. २०.०७.२०२१

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भांकित पत्रास अनुसरून **राज्यातील महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून अनामत म्हणून घेतलेली रक्कम परत करण्याबाबत पुढील प्रमाणे विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. ९७८८ विचारण्यात आलेला आहे.**

| अनु.क्र. | अतारांकित प्रश्न क्र. ९७८८ मधील उपप्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १ | राज्यातील विद्यापीठांशी संलग्नीत सुमारे ३१४१ महाविद्यालयांमध्ये पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून अनामत म्हणून घेतलेली रूपये ५०० कोटींहून अधिक रक्कम अभ्यासक्रम पूर्ण झाला तरी विद्यार्थ्यांना परत दिली नसल्याने विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२१ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय? | |
| २ | असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची अनामत म्हणून घेतलेली रक्कम त्यांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे? | लागू नाही. |
| ३ | नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत? | |

उपरोक्त संदर्भाने **सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी केलेली कार्यवाही तात्काळ/विनाविलंब दि. १३/१२/२०२१ पर्यंत इमेलद्वारा** (mavi.dhepune@gov.in, jdunishivaji@gmail.com, jdhekop@gmail.com) **सादर करावी.**

सदरील माहिती शासकीय कामी आवश्यक आहे. त्यामुळे ज्या महाविद्यालयांकडून विहित कालमर्यादेत माहिती प्राप्त न झाल्यास भविष्यात नमूद बाबत काही प्रश्न उद्भवल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. सबब, सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी याची गांभीर्याने नोंद घेवून तात्काळ/विनाविलंब सदर माहिती पाठवावी.

**आदेशान्वये**

**श्री. व्हि. एस. सोयम**
**उपकुलसचिव**
**संलग्नता टी-२ विभाग**

**सोबत-वरील प्रमाणे**
**संदर्भ क्र. संलग्नता टी-२/** ७२१
**दिनांक-** १०/१२/२०२१

H:\Circular 2019.docx

महाराष्ट्र शासन

# विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण),कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

राजाराम महाविद्यालय परिसर, सागरमाळ कोल्हापूर-४१६००४.

E-mail- jdunishivaji@gmail.com

दुरध्वनी क्रं.०२३१-२५३५४५४ फॅक्स क्रं.०२३१-२५३५४५४

जा.क्र.विससं/कोवि/शिवि.अनु/२०२०-२१/ 6384 दिनांक १०.१२.२०२१

विधानपरिषद अतारांकित प्रश्न/प्रथम प्राधान्याने/अतितात्काळ

प्रति,

मा.कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**विषय - विधान परिषद अतारांकित प्रश्न क्रमांक ९७८८**
**राज्यातील महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून अनामत म्हणून घेतलेली रक्कम परत करण्याबाबत.**

संदर्भ- १. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/वि.प.अता.प्र.९७८८/मवि-१/२०२१/१४१४५ दि.०९.१२.२०२१

२.विधान मंडळ सचिवालयाचे पत्र क्र.----/ई-१ दि.२०.०७.२०२१

महोदय,

संचालनालयाचे संदर्भिय पत्र अवलोकनार्थ सोबत जोडले आहे.

उपरोक्त विषयाबाबतचा अतारांकित प्रश्न स्वीकृत करण्यात आलेला असून त्यामध्ये नमूद प्रश्नांच्या अनुषंगाने प्रश्नोत्तरे स्वरुपातील माहिती व पूरक टिप्पणी तात्काळ **तात्काळ/ विनाविलंब** दि.१३.१२.२०२१ पर्यंत संचालनालयाचे Email ID-**mavi.dhepune@gov.in** तसेच या कार्यालयाचा Email ID-**jdunishivaji@gmail.com, jdhekop@gmail.com** वर तसेच हार्डकॉपीमध्ये पाठविण्यात यावी.

आपला विश्वासू,

**(डॉ.हेमंत ना कठरे)**
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

**सोबत** - वरील प्रमाणे

**प्रत :** मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे- ४११ ००१**

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

दुं ध्वी.०२०/२६१२२११९/२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११९५३

क्र.:उशिसं/वि.प.अता.प्र. ९७८८/मवि-१/२०२१/14145 दिनांक- ९.१२.२०२१

**विधान मंडळ कामकाज**
**अतितात्काळ/कालमर्यादीत**

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.

**विषय: विधान परिषद अतारांकित प्रश्न क्र. ९७८८**
**राज्यातील महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून अनामत म्हणून घेतलेली रक्कत परत करण्याबाबत..**

संदर्भ: विधान मंडळ सचिवालयाचे पत्र क्र.: ------/ई-१ दि. २०.७.२०२१

संदर्भांकित पत्राची प्रत सोबत जोडली आहे, कृपया अवलोकन करावे. विधान परिषद अतारांकित प्रश्न क्र. ९७८८ बाबत प्रश्नोत्तरे व पुरक टिपणी या संचालनालयास दि. १३.१२.२०२१ पर्यंत, mavi.dhepune@gov.in या ई-मेल आय.डी. वर सादर करावी.

विधान मंडळ कामकाजाचे महत्व व गांभिर्य विचारात घेऊन कृपया प्रथम प्राधान्याने कार्यवाही करावी.

(प्रतिभा दीक्षित)
कनिष्ठ प्रशासन अधिकारी,
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.

क्रमांक - ______ / ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
दिनांक - २०-०७-२०२१

प्रति,

**सचिव**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

महोदय,

खालील उदधृत केलेला विधानपरिषद अतारांकित प्रश्न माननीय सभापतींनी स्वीकृत केला आहे. सदरहू प्रश्नाचे उत्तर महाराष्ट्र विधानमंडळ नियमांतील नियम ७०(२) अन्वये तीस दिवसांच्या आत म्हणजे **दिनांक १९ ऑगस्ट, २०२१ पावेतो** या सचिवालयास पाठविण्यात यावे -

**प्रत माहितीसाठी सादर अग्रेषित –**

(१) माननीय मुख्यमंत्री
(२) माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री
(३) सर्व संबंधित सदस्यांना

आपला

प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद

---

**राज्यातील महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून अनामत म्हणून घेतलेली रक्कम परत करण्याबाबत**

**अतारांकित प्रश्न क्रमांक ९७८८** **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ. सुधीर तांबे, श्री. अमरनाथ राजूरकर, श्री. अभिजित वंजारी, डॉ. वजाहत मिर्झा, श्री. जयंत आसगावकर, श्री. राजेश राठोड, श्री. मोहनराव कदम**

**सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

(१) राज्यातील विद्यापीठांशी संलग्नित सुमारे ३१४१ महाविद्यालयांमध्ये पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून अनामत म्हणून घेतलेली रुपये ५०० कोटींहून अधिक रक्कम अभ्यासक्रम पूर्ण झाला तरी विद्यार्थ्यांना परत दिली नसल्याने विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२१ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची अनामत म्हणून घेतलेली रक्कम त्यांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?